# उपसंहार : प्रेमाच्या दिशेने. . .

१५ फेब्रुवारी, २०२४

आत्मीय वाचक,

आतापर्यंत, तुम्ही शिकवणी वाचल्या असतील. तुम्ही त्या ऐकल्या असतील; तुमच्या चिंतनमननाच्या प्रक्रियेदरम्यान तुम्ही त्यांच्यासमवेत दिले गेलेले संगीत तुमच्या चिंतनमननाच्या मूळाशी, त्याच्या वर आणि त्याच्या सभोवताली गुंजायमान होऊ दिले असेल. संत व्हॅलन्टाइन् दिवसाप्रीत्यर्थ, श्रीगुरुमाईंनी आपल्याला प्रदान केला आहे, प्रेमावरील त्यांच्या शिकवणींचा एक विस्मयकारक व अत्यंत प्रभावशाली संग्रह ज्याचे शीर्षक आहे 'प्रेमाच्या दिशेने'; १ फेब्रुवारी २०२४पासून ते १४ फेब्रुवारीपर्यंत, प्रत्येक दिवशी एक-एक शिकवण सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर पोस्ट केली जात होती.

तुम्ही या शिकवणींवर कार्य करत आहात, याची मला पूर्ण खात्री आहे, कारण—तुम्ही तसे सांगितले आहे! किंवा मग, आणखी स्पष्टपणे सांगायचे झाल्यास, तुम्ही तुमच्या अंतर्दृष्टी आणि तुमचे अनुभव सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर पाठवले आहेत. तुमचे अनुभव व तुमची समज वाचणे माझ्यासाठी आनंददायी होते; इतर अनेक लोक त्यांनी वाचलेल्या लेखांवर आणि पुस्तकांवर विचारपूर्वक प्रतिक्रिया देत असतील, पण मला असे आढळून आले आहे की, सिद्धयोगी जे सांगतात त्यामध्ये विशेष असे काहीतरी असते. हे स्पष्टच आहे की, गुरुमाईंनी त्यांच्या शिकवणींचे अध्ययन करणे, त्यांचा अभ्यास करणे, त्या आत्मसात करणे आणि आपल्या दैनंदिन जीवनात त्या कार्यान्वित करणे याविषयी आपल्याला जे शिकवले आहे, ते तुम्ही तुमच्या हृदयात धारण केले आहे. आणि इथे, 'प्रेमाच्या दिशेने' या गुरुमाईंच्या प्रेमाविषयीच्या मार्गदर्शनासमवेतदेखील तुम्ही तेच केले आहे.

एकीकडे अद्‌भुत गोष्ट तर ही आहे की, प्रेम ही अशी गोष्ट आहे, जे आपण सर्वजण जाणतो, आपण सर्वजण ते समजतो आणि आपण सर्वांनी त्याचा अनुभव घेतला आहे. प्रेमाच्या अनेक अभिव्यक्तींशी आपण परिचित आहोत, ते हास्यास्पद पद्धतीने अभिव्यक्त होऊ शकते आणि ते संपूर्णतः उदात्त रूपातदेखील अभिव्यक्त होऊ शकते. [आपण सर्वांनी पाहिले की, एखादी व्यक्ती कशा प्रकारे प्रेमाच्या नावावर असा निर्णय घेते की, ज्यावर शंका उपस्थित होऊ शकते आणि कदाचित आपण स्वतःही असे केले असेल!]

काही वर्षांपूर्वी, याच विषयावर श्रीगुरुमाईंशी माझे संभाषण सुरू होते. वर्ष २०२२च्या त्यांच्या दीपावली कवितेतील एका ओळीविषयी मी त्यांना विचारत होते. गुरुमाईंनी लिहिले होते : *जेव्हा प्रेम जडते, तेव्हा सर्वकाही उज्ज्वल होते.* या ओळीने माझे लक्ष वेधले आणि श्रीगुरुमाईंनी प्रयोग केलेल्या 'प्रेम जडते' या शब्दांमुळे माझ्या मनात कुतूहल निर्माण झाले. हा असा शब्दप्रयोग आहे, जो सामान्यतः प्रणयभावनेशी म्हणजे रोमांससंबंधी प्रेमाशी जोडला जातो, तरीदेखील त्यावेळी मला हे समजले होते की, या कवितेत गुरुमाई ज्या प्रेमाविषयी बोलत आहेत, ते फक्त या एका पैलूपुरतेच मर्यादित नाही.

गुरुमाईंनी समजावून सांगितले की, त्यांनी या शब्दांची निवड अगदी जाणूनबुजून केली होती. 'प्रेम जडणे' हा असा अनुभव आहे जो अनेक लोकांच्या परिचयाचा आहे—तो अनुभव, जेव्हा असे वाटते की, सूर्यप्रकाशात न्हाऊन निघालेले चमचमते धुके सर्वत्र पसरले आहे, तो सुंदर क्षण अशा उत्सुकतेने, अशा विस्मयाने पूरित असतो की, असे वाटते की, जणूकाही रात्रीच्या आकाशातील सर्व तारे बाहेरच नव्हे, तर तुमच्या अंतरीदेखील चमचमत आहेत. आणि असा अनुभव एखाद्या विशिष्ट परिस्थितीतच जरी येत असला, तरी प्रेमाचा हा अनुभव मूलतः विस्तीर्ण प्रेमाचाच भाग आहे. अशा प्रकारे, हा अनुभव एक संदर्भबिंदू प्रदान करतो, ज्याच्या साहाय्याने आपण प्रेमाला त्या रूपात समजू शकतो जसे गुरुमाई त्याच्याविषयी शिकवतात. श्रीगुरुमाईंनी पुढे समजावून सांगितले, "एखाद्या व्यक्तीला किंवा एखाद्या वृक्षाला किंवा एखाद्या गोष्टीला पाहून तुझे हृदय ज्या प्रकारे आल्हादित होते, प्रकाशाचा जो किरण तू अनुभवतेस—हे दिव्य प्रेमाहून भिन्न नाही."

तेव्हा, प्रेमाचा अनुभव घेण्याचे अनेक मार्ग आहेत, या अनुभूतीपर्यंत पोहोचण्याची अनेक प्रवेशद्वारे आहेत आणि आपण त्यांच्याशी चांगल्या प्रकारे परिचित आहोत. त्याचबरोबर, मला असे आढळून आले आहे की, प्रेमाविषयी अनेक गैरसमजदेखील आहेत. आता, सर्वप्रथम मीच हे कबूल करते की, एखादी रोचक प्रेमकथा वाचण्यासाठी किंवा प्रेमगीत ऐकण्यासाठी मी नेहमीच उत्सुक असते. [निदान, माझ्या स्वतःविषयी मला असे वाटते की, प्रेम या विषयाची मला उत्तम जाण आहे.] पण, मी जे काही वाचले आहे, पाहिले आणि ऐकले आहे—आणि माझ्या स्वतःच्या जीवनातील काही लोकांनीदेखील जे काही मला सांगितले आहे—त्यामध्ये एक प्रवृत्ती झळकताना मला आढळून आली आहे, त्या प्रवृत्तीमुळे ते लोक असे मानतात की, प्रेम म्हटले की, त्यात दुःख व यातना या येणारच. असे प्रतीत होते की, लोकांचा असा समज आहे की, यांपैकी एक गोष्ट नसेल, तर तुम्हाला दुसरीही मिळणार नाही. आणि जेव्हा मुद्दा असतो एखाद्या प्रेमकथेचा, तेव्हा सदैव असेच घडते की, संघर्ष, विरोध किंवा अनिश्चितता हेच त्या कथेचे भाग असतात आणि तेच कथेची रोचकता टिकवून ठेवतात, त्यांच्याच आधारे कथानक पुढे सरकते आणि प्रेक्षकांना व श्रोत्यांना कथेत रममाण होण्यासाठी हेच आकर्षित करते. असे भासते

की, प्रेम स्वतः तसेच त्याबरोबरच त्याच्याशी निगडीत असलेल्या भावना जसे की, आनंद, शांती, समर्पण लोकांचे लक्ष खिळवून ठेवण्यासाठी तितक्या चित्ताकर्षकही नसतात आणि त्यांच्यात तितकेसे नावीन्यदेखील नसते जेणेकरून लोक ती कथा फार वेळ वाचत किंवा ऐकत राहू शकतील.

तथापि, प्रेमाविषयीचे माझे स्वतःचे अनुभव आणि विशेषतः त्या प्रेमाचे अनुभव, जे प्रेम मला गुरुमाईंनी दर्शवले आहे व ज्याच्याविषयी त्यांनी मला शिकवले आहे, ते या अशा मतांपासून व समजूतींपासून भिन्न आहे. मला आठवते की, एकदा गुरुमाई मला प्रेमाच्या स्वरूपाविषयी आणि शिष्यावर असलेल्या गुरूंच्या प्रेमाविषयी समजावून सांगत होत्या. थेट माझ्या डोळ्यांमध्ये पाहून त्या म्हणाल्या, "तुझ्यावरील माझे प्रेम कधीही कमी होऊ शकणार नाही." त्यांनी त्यांचा हात आकाशाच्या दिशेने वर उचलला. "हे प्रेम केवळ वर, आणखी अधिक वरच्या दिशेने जाऊ शकते, वायुमंडलातून जात, ब्रह्मांडाच्याही पलीकडे." त्यांनी जमिनीकडे अंगुलीनिर्देश केला. "हे प्रेम केवळ अधिकाधिक खोलवरच जाऊ शकते, या पृथ्वीच्या गाभ्यापर्यंत."

त्या क्षणी मी हे सांगू शकत नव्हते की, माझ्या डोक्यावरील आकाश खुले होते आहे, [निश्चितच कुठे ना कुठेतरी देवदूत गात असतील] की माझ्या पायाखालची जमीन सरकते आहे. परंतु मला याची एक झलक नक्कीच मिळाली—मी पाहिले की, गुरुमाई ज्या प्रेमाविषयी सांगत आहेत, ते प्रेम किती व्यापक आहे, ते अनंततेपर्यंत विस्तृत होऊ शकते, त्याच्यात असीमित ऊर्जा आहे. माझ्या लक्षात आले की, मी असा विचार करण्यात कितीतरी वेळ घालवला आहे की, सरतेशेवटी माझ्यासाठी प्रेम असेल *का*—मी याची चिंता करत बसले होते की, ते किती वेळ टिकेल आणि कोणास ठाऊक ते केव्हा निघून जाईल. तरीदेखील, खरा प्रश्न हा होता की, *मी* प्रेमाला ओळखू शकेन का—आणि मग, मी त्याच्यात बुडी मारून जर त्यात खोलवर उतरत गेले, तर मला कशा-कशाचा शोध लागेल. याविषयीच्या शक्यता रोमांचकारक आणि स्फूर्तीदायक होत्या.

हे सर्वकाही मला सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवरील गुरुमाईंच्या शिकवणींकडे घेऊन येते. 'प्रेमाच्या दिशेने.' तुमचे अनुभव वाचून मला असे वाटले की, तुम्हालादेखील प्रेमाच्या या सूक्ष्म छटांचे आकलन होते आहे, तुम्हाला हे समजते आहे की, प्राचीन भारतातील ऋषिमुनी ज्याला 'द्वैत' [सुख-दुःख, फायदा-तोटा, इत्यादी] म्हणून संबोधित करतात, प्रेम हे त्याहून भिन्न आहे व त्याच्याही पलीकडे आहे. उदाहरणार्थ, तुमच्यापैकी एकाने, चवथ्या शिकवणीविषयीची स्वतःची समज सांगताना लिहिले आहे : "माझ्या असे लक्षात आले आहे की, प्रेमाचा अनुभव घेण्यासाठी, मला असा प्रयत्न करावाच लागेल की, जेणेकरून मी *त्याला त्याच रूपात पाहावे* जसे ते आहे. . . जर मी माझ्या पूर्वधारणा त्यावर लादल्या,

तर त्यामुळे त्याच्या गूढ सान्निध्यात आणि त्याच्या प्रवाहात मला प्रवेश करता येणार नाही. . . हे असेच आहे की, जणूकाही मी स्वतःला या जादुई साम्राज्याप्रति समर्पित करताच त्याच्यात प्रवेश करण्याची स्वीकृती मला सहजच मिळाली आहे."

तुमच्यापैकी अनेक लोकांनी 'प्रेमाच्या दिशेने' या विषयावरील श्रीगुरुमाईंच्या शिकवणींची तुमची समज वर्ष २०२४च्या त्यांच्या नववर्ष संदेशाच्या तुमच्या अध्ययनाशीदेखील जोडली आहे. 'आत्मगौरव' यामध्ये काय निहित आहे आणि त्यासाठी काय आवश्यक आहे याविषयी तुम्हाला अधिक जाण आली आहे. तुमच्यापैकी एका व्यक्तीने लिहिले, "आत्मगौरव कायम ठेवण्यासाठी, मला प्रेमाला महत्त्व द्यावे लागेल, त्याची कदर करावी लागेल." तुम्ही, 'कृपेप्रति खुले राहणे' याविषयी लिहिले आणि असे केल्याने, प्रेमाच्या दिशेने आपल्या मार्गावर वाटचाल करत असताना तुम्हाला ज्या अंतर्दृष्टी प्राप्त झाल्या, जी समज मिळाली आणि जे संयोग आढळून आले त्या सर्वांविषयीदेखील तुम्ही लिहिले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, तुमचे अनुभव या गोष्टीचे वर्णनही करतात व त्याबरोबरच प्रत्यक्षपणे दर्शवतातदेखील, की तुम्ही 'तुमच्या दिव्यतेशी जोडलेले राहण्यासाठी' किती प्रयत्नशील आहात. तुम्ही तुमच्या त्या प्रयत्नांविषयी सांगितले की, प्रेमाचे स्मरण ठेवणे आणि त्याच्या दिशेने वाटचाल करणे ही अशी एक पद्धत आहे, जिच्या साहाय्याने तुम्ही हा आंतरिक संबंध मजबूतपणे टिकवून ठेवत आहात.

मी या वर्णनाशी सहमत आहे. अलीकडेच, मी दोन सिद्धयोगींशी बोलत होते, जे एका लहान मुलाचे पालक आहेत. त्यांनी मला सांगितले की, जानेवारी महिन्यातील एका विशिष्ट दिवशी त्यांच्या मुलाने झोपण्यापूर्वी गुरुमाईंविषयी एक कविता लिहिण्याचा हट्ट केला. तेव्हा, पुढील काही दिवस त्याने हेच केले; गुरुमाईंवरील त्याचे प्रेम व्यक्त करण्यासाठी त्याने दररोज एक कविता लिहिली.

मी जेव्हा हा प्रसंग ऐकला, तेव्हा मी अविश्वासाने हसले. खरे सांगायचे तर, जानेवारी महिन्याच्या त्याच दिवशी श्रीगुरुमाईंनी माझ्याजवळ *त्यांचा* मनोदय व्यक्त केला होता की, व्हॅलन्टाइन् दिवसाप्रीत्यर्थ, त्यांना प्रत्येक दिवशी प्रेमावर एक शिकवण लिहायची आहे. माझ्यासाठी हे अतिशय स्पष्ट होते—हा लहान मुलगा एकलय होता, सुसंगत होता. आणि स्वतःच्या हृदयात प्रेमाचा सन्मान करून तो त्याच्या स्वतःच्याच रीतीने हे सुनिश्चित करत होता की, तो 'जोडलेला राहील,' त्याचा आंतरिक संबंध टिकून राहील.

तुम्हाला आठवत असेल, श्रीगुरुमाईंनीच या वर्षीच्या त्यांच्या संदेशाच्या संदर्भात प्रेमाविषयी सर्वप्रथम शिकवले होते. ७ जानेवारीला, श्रीगुरुगीता पठणाच्या वर्धापनदिनाच्या सन्मानार्थ झालेल्या थेट व्हिडिओ प्रसारण सत्संगामध्ये, गुरुमाईंनी सत्संगात सहभागी झालेल्या सिद्धयोगाच्या तीन स्वामींना

संदेशाविषयीचे त्यांचे अनुभव व समज सांगण्यास सांगितले होते. श्रीगुरुमाईंनी या स्वामींना त्यांचे अनुभव यासाठी सांगण्यास सांगितले, कारण त्या जाणत होत्या की, त्यांच्यापैकी प्रत्येकजण संदेशाचा अभ्यास करण्यासाठी एक विशिष्ट योजनाबद्ध आराखडा तयार करतो आणि म्हणूनच ते जे काही सांगतील त्याचे श्रवण करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला त्यातून उपयुक्त अंतर्दृष्टी प्राप्त होऊ शकेल.

अपेक्षित असल्याप्रमाणे, तिन्ही स्वामींनी अतिशय ठोस आणि उपयुक्त स्पष्टीकरणे दिली. आणि त्यांपैकी विशेषतः एका स्वामींनी जे सांगितले, त्याकडे मी तुमचे लक्ष वेधू इच्छिते. गुरुमाईंच्या नववर्ष संदेशाच्या अभ्यासासाठी त्या स्वामींनी अवलंबलेल्या पद्धतीविषयी सारांशाने सांगितल्यानंतर त्यांनी सांगितले की, संदेशाच्या शब्दांचा अर्थ आत्मसात करणे त्यांच्यासाठी किती सहजसोपे झाले आहे—उदाहरणार्थ, 'आत्मगौरवात ताठ मानेने उभे राहा.' त्यानंतर विनोद आणि विनम्रता यांच्या मिश्रित भावाने, स्वतःच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत ते स्वामी म्हणाले : "तसेही, आत्मगौरव हा कधीही माझा विशेष गुण नव्हता. तेव्हा ते आश्चर्यजनक होते."

स्वामींनी असे सांगताच, गुरुमाई हसू लागल्या; स्वामी जी हसू लागले; आम्ही सर्वजण हसू लागलो! ते बहुधा अपेक्षितच होते—हे स्वामी, लहान मुले आणि प्रौढ या दोहोंना सारखेच प्रिय आहेत आणि ते जिथे कुठे असतील आणि जिथे कुठे जातील तिथे आनंद पसरवण्याचा एक विलक्षण गुण त्यांच्यात आहे. जेव्हा हे स्वामी आसपास असतात, तेव्हा त्यांच्या सान्निध्यातील सर्व लोक खळखळून हसत असतात.

तिन्ही स्वामी आपापल्या जागी स्थानापन्न झाल्यानंतर, गुरुमाईंनी स्मित केले आणि म्हणाल्या, "मला काही सांगायचे आहे. स्वामीजी, तुमच्यापाशी महान आत्मगौरव निश्चितच आहे." गुरुमाईंनी पुढे विशद केले की, आत्मगौरवाची अनेक रूपे असतात. त्या म्हणाल्या, अशा रीतीने, आत्मगौरव हा प्रेमासम आहे.

गुरुमाईंनी नंतर एक प्रश्न विचारला : "प्रेम काय आहे?" आम्ही यावर विचार करत असताना गुरुमाईंनी काही संभाव्य उत्तरे सांगितली— प्रेम या विषयाच्या अंतर्गत काय-काय समाविष्ट आहे याविषयी लोक जे सांगतील अशा विविध गोष्टी त्यांनी सांगितल्या. मला आठवते की, त्यावेळी मी असा विचार करत होते की, तृप्तीच्या भावासह मी त्याच क्षणामध्ये थांबून राहावे आणि प्रेम काय आहे व त्यात काय निहित आहे, त्यासाठी काय आवश्यक आहे याविषयी गुरुमाई जे काही समजावून सांगत आहेत, ते ऐकत राहावे. माझ्या मनात एक इच्छा पल्लवित होत होती. आणि ती अगदी लगेचच जरी पूर्ण झाली नाही, तरीदेखील ती पुढील काहीच आठवड्यांमध्ये फलद्रूप झाली आणि इतक्या शानदार व सुंदर रीतीने फलद्रूप झाली की, मी कधी विचारही केला नव्हता. 'प्रेमाच्या दिशेने.'

***

व्हॅलन्टाइन् डे या दिवशी आपल्याला ‘प्रेमाच्या दिशेने’ची शेवटची शिकवण प्राप्त झाली—तो सर्वोच्च बिंदू होता, ते समापन होते, एका दृष्टीने या अतुलनीय शिकवणींच्या संग्रहातील सर्वश्रेष्ठ शिकवण. मला असे वाटते आहे की, मागील दोन आठवड्यांमध्ये आपण सर्वजण संपूर्णतः एका अनोख्याच साम्राज्यात विहार करत होतो, आपण एका अशा विलक्षण प्रेममय वातावरणात होतो ज्यामध्ये आपल्याला भरभरून मिळत होते, आणि माझे, तुमचे, आपल्या सर्वांची पात्रे काठोकाठ भरून ओसंडून वाहत आहेत. १ फेब्रुवारीला जेव्हा पहिली शिकवण आली होती, तेव्हा माझे हृदय प्रेमाने उचंबळत होते—प्रत्येक गोष्टीसाठी प्रेम, आणि तरीही ते एका विशिष्ट गोष्टीपुरतेच नव्हते, आणि सर्वात अधिक या प्रेमाची अनुभूती जी मला होत होती, ती श्रीगुरुमाईंसाठी. आणि मग दुसरा दिवस आला, तिसरा दिवस आला व मग चौथा दिवस. आणि प्रत्येक दिवसाची शिकवण माझी आवडती शिकवण बनत होती, माझ्या अनुभवाचे स्वरूप राहिले तर तसेच, पण त्याबरोबरच ते बदलतही होते—सर्वप्रथम मला तो प्रेमाच्या झऱ्यासारखा वाटला, नंतर खळखळणाऱ्या नदीसारखा आणि मग असे वाटले की, हा पूर्णपणे शांत समुद्र आहे. प्रत्येक दिवशी, हे प्रेम विस्तृत होत होते; प्रत्येक दिवशी असे वाटत होते की, जणूकाही प्रेमाची माझी क्षमता वाढते आहे.

या बिंदूवर येऊन पोहोचल्यावर, हे अशक्य वाटते की, हे प्रेम आणखी अधिक विस्तृत होऊ शकते—तथापि माझ्या मनाच्या तळाशी दडलेली एक हळूवार भावना ही आहे की, असे होऊदेखील शकते, प्रेम अधिक व्यापक होऊ शकते. एक गोष्ट जी आपण निश्चितच करू शकतो ती ही की, आपण ‘प्रेमाच्या दिशेने’मधील शिकवणींकडे पुन्हापुन्हा परत येऊ शकतो. त्या शिकवणींवर कार्य करत राहण्यासाठी आपण निरनिराळ्या पद्धती उपयोगात आणू शकतो. मी तुम्हाला एक विशिष्ट पद्धत अवलंबण्याचा सल्ला देऊ शकते का? प्रथम शिकवण वाचा, मग ती ऐका आणि मग त्या शिकवणीसाठी इंग्रजी पृष्ठावर जे संगीत दिले आहे ते सुरू करा, शिकवण वाचून तुम्ही आत्ता जे ग्रहण केले आहे, त्यावर मनन करत असताना तुम्ही संगीत ऐका. या संगीतामध्ये ‘पॅनफ्लूट’चा [एक प्रकारची बासरी] आणि इतर ध्वनींचा समावेश आहे. संगीत ऐकत असताना तुमच्या अंतरी खुलेपणा ठेवा, पाहा की, तुमच्या अंतरी काय उद्‌भवते आहे—तुमच्या मनात कोणते विचार, कल्पना किंवा चित्राकार येतात, तुम्ही कोणती पावले उचलू इच्छिता. माझ्या मते असे म्हणणे योग्य राहील की, प्रेरणा कोणत्याही रूपात प्रकट होऊ शकते आणि *होईलही.*

‘प्रेमाच्या दिशेने. . .’ या पोस्टच्या डिझाइनबद्दलही मी तुम्हाला थोडेसे सांगू इच्छिते. याविषयी सांगण्यापूर्वी मला हे सांगायचे आहे की, जवळजवळ नेहमीच असे घडत असते की, तुम्ही सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर जेव्हा एखादे डिझाइन पाहता, तेव्हा डोळ्यांना जे दिसते त्यापेक्षा कितीतरी अधिक विशेष गोष्टी त्यामागे दडलेल्या असतात. त्या डिझाइनची खास प्रतीकात्मकता असते, त्याचे विशेष महत्त्व असते. आणि या पोस्टच्या डिझाइनबद्दलही असेच आहे—तुम्ही पाहिले असेल की, प्रत्येक शिकवणीच्या इंग्रजी पृष्ठावर, शिकवणीच्या खालच्या बाजूला पानांच्या एका लहान डहाळीचे चित्र आहे. [इतकेच नाही, तर हीच पाने या पत्राच्या डिझाइनलादेखील सुशोभित करत आहेत.]

ही ‘कौरी’ वृक्षाची पाने आहेत, जो न्यूझीलंडचा स्थानिक वृक्ष आहे. श्रीगुरुमाईंनी मला सांगितले की, त्यांना एका विशेष कौरी वृक्षाच्या कथेपासून प्रेरणा मिळाली होती, ज्या वृक्षाला माओरी भाषेत ‘टाने माहूता’ म्हटले जाते आणि या वृक्षाला अनेकदा ‘वनदेवता [किंवा स्वामी]’ म्हणतात. हा वृक्ष अंदाजे २००० वर्षे जुना असल्याचे अनुमान आहे. श्रीगुरुमाई म्हणाल्या, “या पृथ्वी ग्रहाविषयी असलेल्या त्याच्या प्रेमापोटी इतक्या वर्षांपासून हा वृक्ष उभा आहे.”

सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवरील विभिन्न कलाकृतींविषयी म्हणजेच डिझाइनविषयी आणखी एक गोष्ट ही आहे की, आम्ही विश्वाच्या ज्या कोणत्या भागातील वनस्पती, पशू किंवा कलाकृती वेबसाइटवर प्रदर्शित करू इच्छितो, आम्ही जितके शक्य असेल तितके प्रयत्न करतो की, असे करण्यासाठी आम्ही त्या अद्‌भुत सिद्धयोगींची मदत घ्यावी जे त्या भागात जाऊन आले असतील. सहसा, आम्ही हेदेखील पाहतो की, याविषयी शक्तिपुंज आरकाइव्ज्‌मध्ये काय-काय संग्रहीत आहे. संदीप क्नोसल, जे एस. वाय. डी. ए. फाउंडेशनच्या वेबसाइट विभागाचे प्रमुख आहेत, त्यांनी मला सांगितले की, गुरुमाईंकडून त्यांना जेव्हा ‘प्रेमाच्या दिशेने’ या पोस्टच्या डिझाइनसाठी निर्देश मिळाला, तेव्हा त्यांना लगेच लक्षात आले की, यासाठी ते कोणाशी संपर्क साधू शकतात—ते अशा एका कुटुंबाला ओळखतात जे न्यूझीलंडमधील या पवित्र स्थानी जाऊन आले आहेत आणि ते इतर अनेक सिद्धयोगींनाही जाणतात जे या ठिकाणी जाऊन आले आहेत. लगेचच, लोकांनी इथले फोटो पाठवायला सुरुवात केली. हे स्वतःच एक हृदयस्पर्शी उदाहरण आहे की, कशा प्रकारे भिन्न-भिन्न माध्यमांतून प्रेम येऊ शकते—आणि त्या प्रेमाचे प्रेरणास्रोत कशा प्रकारे आपल्या स्मृतीपटलावर कोरले जातात.

आणि आता आपण परत वळू या, ‘टाने माहूता’कडे : यापेक्षा अधिक योग्य असे एखादे प्रेमाचे प्रतीक असू शकते का? या प्रसिद्ध वृक्षाप्रमाणेच, प्रेम चिरकालीन आहे. या महान वृक्षाप्रमाणेच प्रेम नूतन आहे, हे सतत पुनर्जीवित होत राहते. माओरीच्या परंपरेनुसार हा वृक्ष वनांची आणि पक्ष्यांची देवता आहे. या

वृक्षाप्रमाणेच प्रेम आश्रय देते; प्रेम उंच भरारी घेण्यास साहाय्यक असते. पौराणिक कथांनुसार या वृक्षाला मानवजातीचा निर्माता म्हटले जाते, या वृक्षाप्रमाणेच प्रेम मानवाच्या आत्म्याला त्याचे सार प्रदान करते. या वृक्षाप्रमाणेच प्रेम महाकाव्य आहे. या वृक्षाप्रमाणेच प्रेम प्रतिष्ठित आहे. प्रेम आहे, होते आणि सदैव राहील.

तुम्ही तुमचे अनुभव पाठवताना तुमच्यातील अनेकांनी श्रीगुरुमाईंच्या “अंतःशुद्धीचे सोपान” या पुस्तकातील त्यांचे उत्कृष्ट शब्द उद्धृत केले आहेत : “आरंभी प्रेम. अखेरीस प्रेम. मध्ये, आपल्याला सद्‌गुणांचा विकास करायचा आहे.”[१] माझ्या लक्षात येते आहे की, ‘प्रेमाच्या दिशेने’ पुढे जाण्याचा अर्थ काय आहे याविषयी चिंतन करताना तुम्ही या शब्दांचा विचार का केला असेल.

आदरपूर्वक,
ईशा सरदेसाई

© २०२४ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

---

[१] गुरुमाई चिद्विलासानंद, *अंतःशुद्धीचे सोपान* [चित्शक्ती पब्लिकेशन्स, २०१३], पृ १८०.